ग्राम पंचायत व ग्रामसभा यांच्या सभांना ग्राम पातळीवरील कामगारांना बोलाविणे.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्रमांक: व्हीपीएम्-२६७१-२६२८४-ई,
सचिवालय, मुंबई-३२, दिनांक २२ जून १९७१.

पहा:- शासकीय परिपत्रक, सहकार व ग्राम विकास विभाग, क्रमांक: व्हीपीएम्-२४६१-४७७४८-ई, दिनांक ७ फेब्रुवारी १९६२.

परिपत्रक:- ग्राम पंचायतीच्या सभांना तलाठी, शाळामास्तर, इत्यादि ग्राम पातळीवरील कामगारांना बोलवावे अशा आशयाच्या सूचना वर उल्लेखिलेल्या परिपत्रकांत देण्यात आल्या होत्या. या सूचना, या राज्यात पंचायती राज संस्था अस्तित्वांत येण्यापूर्वी दिलेल्या होत्या. बदललेली परिस्थिती लक्षात घेऊन याबाबत पूर्वी दिलेल्या सूचना रद्द करून खालील नव्या सूचना देण्यात येत आहेत.

२. ग्रामपंचायतीने आपल्या इच्छेनुसार खालील ग्राम कामगारांना ग्रामपंचायतीच्या तसेच ग्राम सभेच्या सभांना हजर रहाण्यासाठीं पाचारण करण्यास हरकत नाही. त्यांना ग्राम पंचायतीच्या सभेमध्ये भाग घेण्याचा किंवा मत देण्याचा अधिकार असणार नाही. मात्र सरपंच किंवा सभाध्यक्षांनी विनंती केल्यास, त्यांना चर्चेत भाग घेऊन आपले मत प्रदर्शित करता येईल. जर ते ग्राम पंचायतीचे मतदार असतील तर, त्यांना ग्राम सभेतील चर्चेत भाग घेता येईल व मतही देता येईल.

(१) ग्राम पंचायतीच्या मासिक सभांना व ग्राम सभेला तलाठ्यांना बोलावण्यास हरकत नाही.

(२) ज्या ठिकाणी ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत सचिव यांचा एकत्रित संवर्ग अस्तित्वांत नसेल अशा ठिकाणी ग्रामसेवकांनाही ग्राम पंचायतीच्या मासिक सभा व ग्राम सभा यांना बोलावण्यास हरकत नाही.

(कृ.मा.प.)

OFFICE OF THE COLLECTOR, RATNAGIRI.
Date 27 JUL 1971
Branch

(३) ग्रामपंचायतीच्या सभेत अगर ग्रामसभेत ज्या वेळी, माध्यमिक शिक्षण विषयक प्रश्नाची चर्चा होण्याचा संभव असेल त्यावेळी गावातील माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकाला व ज्यावेळी प्राथमिक विषयक चर्चा होण्याचा संभव असेल त्यावेळी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाला बोलावण्यास हरकत नाही. मात्र जर गावांत माध्यमिक शाळा नसेल तर शिक्षण विषयक कोणताही प्रश्न असला तरी गांवच्या प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापकाला बोलाविण्यास हरकत नाही.

(४) गावातील शेती किंवा कर्ज देण्याशी संबंधीत असलेल्या सहकारी संस्थेचा सभापती हा नवीन व्यवस्थेनुसार ग्रामपंचायतीचा सहयोगी सभासद असतो. अशा परिस्थितीत सहकारी संस्थांच्या दुसऱ्या कोणत्याही प्रतिनिधीला ग्रामपंचायत किंवा ग्रामसभा यांच्या सभांना बोलाविण्याची गरज नाही.

२. सर्व गट विकास अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येते की त्यांच्या अखत्यारांतील सर्व ग्राम पंचायतीच्या नजरेस वरील सूचना आणून द्याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

स. के. कुळकर्णी,

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व उपनगर जिल्हाधिकारी सोडून),

सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

सर्व गट विकास अधिकारी,

शिक्षण, क्रीडा व समाज कल्याण विभाग,

महसूल व वन विभाग,

कृषि व सहकार विभाग.

...